दैनिक
# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## हिंमत असेल तर खासदारांच्या केसाला धक्का लावून दाखवा; रामदास कदमांचा संजय राऊतांना इशारा

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरेंवर ही वेळ का आली?, ४० आमदार गेले, नेते गेले, पदाधिकारी गेले, आज खासदार गेले. उद्या आमदार जातील, नगरसेवक जातील, आपण कुठे चुकतोय हे पाहा. 'ऑपरेशन तुडवा संजय राऊत बोलताहेत, आमच्या अंगावर कुणी आले तर शिंगावर घेऊ...हिंमत असेल तर एकाही खासदाराच्या केसाला धक्का लावून पाहा तर काय होते ते पाहा... आम्ही कायद्याचे राज्य मानणारे आहोत, त्याचा अर्थ नाही. वेळ पडली तर तुमच्या घरात घुसून शिवसैनिकांची ताकद दाखवू असा इशारा रामदास कदम यांनी संजय राऊत यांना दिला.

शिवसेना वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी रामदास कदम म्हणाले की, जेवढे दिवस संजय राऊत तिथे थांबतील तेवढे आमच्यासाठी चांगले आहे. संजय राऊत, आमच्या नादाला लागू नको. शिवसेनाप्रमुखांच्या विचारांशी बेईमानी कुणी केली? युतीत लढले असताना सोनिया गांधींचे पाय धरायला कोण गेले? शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधायचे काम केले. एकनाथ शिंदे आज संघटनावाढीसाठी काम करताहेत. गेल्या ३ दिवसांपासून एकनाथ शिंदे झोपले नाहीत. आज शिवसैनिकांना एकनाथ शिंदेंचा अभिमान आहे. महाराष्ट्रात खरा टायगर कोण असेल तर ते एकनाथ शिंदेंच आहेत हे महाराष्ट्राने पाहिले असंही त्यांनी म्हटलं.


(वर्ष ६५ वे अंक १५९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२० जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# मातोश्रीने फक्त वाढायचे काम करायचे, जेवायचे काम त्यांनी करायचे

## पक्ष सोडलेल्या खासदारांना उद्धव ठाकरेंचे उत्तर, ओमराजेंवरही संतापले

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- 'शिवसेनाप्रमुखांनी काय टीका सहन केली हे तुम्हाला माहिती आहे. आज माझ्यावर टीका होते. माझ्या पत्नीवर टीका होते. आदित्यवर घाणेरडे आरोप होतात. तेजसवर होतात. का? तर जेव्हा भाजपाने दगा दिला, तेव्हा मला मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारावी लागली म्हणून हा जळफळाट झाला. मातोश्रीने फक्त वाढायचं काम करायचं, जेवायचं काम ते करणार', असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी आरोप करणाऱ्या शिंदेसेनेच्या नेत्यांना खडेबोल सुनावले.

शिवसेना वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे आपल्या भाषणात शिंदेसेनेच्या नेत्यांवर टीका करताना म्हणाले, 'जे काही मिळेल... मंत्री मीच झालो पाहिजे. मुख्यमंत्री मीच झालो पाहिजे. माझं कारटं खासदार झालं पाहिजे, मंत्री झालं पाहिजे. मातोश्रीने भोगायचं. आम्हाला नको हे काही. पण, सोसायचं किती?', असा सवाल ठाकरेंनी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांना केला.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना ठाकरे म्हणाले, 'उद्धवजींचं ठीक आहे, पण आदित्यने फिरायला हवे. अरे पण जेव्हा जेव्हा आमच्या कुटुंबावर हल्ले झाले. कोणाचे शाब्दिक किंवा काही. आरोप केल्यानंतर या गधड्यांपैकी एक तरी छातीची ढाल करून आमच्यासमोर उभा राहिला होता का, त्यांचे वार झेल ायला?'

'आज जी काही गद्दारी झाली आहे. मी त्या त्या वार्डातील तमाम मतदारांची जाहीर माफी मागतो. कारण त्या सगळ्या मतदारांनी अगदी मोदींची लाट असताना... माझ्यावरती, बाळासाहेबांवरती विश्वास ठेवून यांना निवडून दिले होते. जे आम्हाला डिवचले जात होते की, तुमचे मोदींच्या चेहऱ्यावर खासदार निवडून आले. मोदींचा चेहरा न वापरता आपल्या शिवसेनेचे नऊ खासदार डौलाने निवडून आले होते. कुठे होते मोदी?', असे ठाकरे म्हणाले.

'आज परत फोडाफोडी, परत फोडाफोडी. कशासाठी फोडत आहात? काय मिळवायचे तुम्हाला? सत्तापिपासू किती व्हायचे? बंगालमध्ये दोन-अडीच सीमा सुरक्षा दल घुसवले. एका महिल ेला हरवण्यासाठी. स्वतःचा पक्ष जिंकवण्यासाठी देशाचे सुरक्षा दल तुम्ही वापरता. कुणालाच काही वाटत नाही? दोन-अडीच लाख फौज तुम्ही निवडणूक जिंकण्यासाठी वापरता तर मग मणिपूरमध्ये का घुसवत नाही?', असा सवाल ठाकरेंनी केला.



देशाच्या हिताचे निर्णय घ्या, आम्ही पाकिस्तानातून आलेलो नाही आम्ही देशप्रेमी आहोत. माझ्या आजोबाला विरोध करणारे गोमूत्र धारी होते. आमचा हिंदुत्व शेंडी जाणव्याचा नाही. राष्ट्रीयत्व हे आमचं हिंदुत्व आहे, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

भेसळ युक्त रक्त भगवा हातात घेऊ शकत नाही. लोकशाही वरचा विश्वास उडून चालला आहे. आपण म्हणतो मशाल समोर बटन दाबा, मतं आम्हाल ा मिळेल. पवारसाहेब म्हणतात तुतारीचं बटणं दाबा, मतं आम्हाला मिळतील. पण भाजपवाले म्हणतात कोणाचंही बटणं दाबा माणूस आमच्याकडे येणार, असा टोला उद्धव ठाकरेंनी मारला.

आता देशाला आणि आपल्या सगळ्यांना मिळून ऑपरेशन कमळ करावं लागेल. तरुणांना झुरळ म्हणतात या देशाचा भवितव्य काय? सध्या ल ोकशाहीला धोका निर्माण झालेला आहे. जे.पी. नड्डा बोलले होते, वन नेशन इलेक्शन आता यांची वाटचाल वन नेशन नो इलेक्शनच्या दिशेनं सुरु आहे. तुम्ही या वाटेनें जातं असाल तर दीर्घाकाळ सत्ता मिळणार नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेना
वर्धापण दिन
६०
वर्षे पूर्ण

माझ्या नेतृत्त्वावर आरोप होत असतील तर मी या पदावरुन उतरायला तयार आहे. याचं उत्तर विचार करुन द्या. माझ्यावरील आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी पद सोडायला तयार आहे. फक्त अट एकच आहे की, ही सोन्यासारखी शिवसेना दरोडेखोर आणि गद्दारांच्या हातात जाऊन द्यायची नाही. माझ्यावर कोणी आरोप करत असेल तर त्याला उत्तर तुम्ही द्यायचं आहे. मला नेतृत्त्वाची हाव नाही. त्यामुळे मी पद सोडायला तयार आहे. बाकी मी डगमगलेलो नाही, खचलेलो नाही. अनेक संकटं आणि वादळं आल ी तरी मी पहाडासारखा उभा राहीन. पण ज्यावेळी मी पद सोडावं असं तुम्हाला वाटेल तेव्हा मी पद सोडल्याशिवाय राहणार नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा शेवट केला.

# बाळासाहेबांचे विचार पुढे नेणाऱ्यांना शिव्या देता आणि काँग्रेसच्या ओव्या गाता!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हल्लाबोल

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- 'शिवसेना म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा नाही, तर तो आपल्या काळजाचा तुकडा आणि भगवं वादळ आहे,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली. 'बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे नेणाऱ्यांना तुम्ही शिव्या घालता, पण काँग्रेसच्या ओव्या गाता अशा शब्दात उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला' पुढे ते म्हणाले की आम्ही चार वर्षांपूर्वी जो ऐतिहासिक उठाव केला, तो आज 'सुपर हिट' ठरला आहे, शिवसेनेला ६० वर्ष पूर्ण झाली त्या निमित्ताने आज गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथ शिवसेनेचा वर्धापन दिन कार्यक्रम पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

आक्रमक भाषण करतांना शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टिका केली. खुर्चीसाठी बाळासाहेबांचे हिंदुत्व सोडल्याचा आरोप केला. ते म्हणाले, 'आम्ही जेव्हा उठाव केला, तेव्हा कुणीही सोबत येणार नाही, कुणीही निवडून येणार नाही, अशा वल्गना केल्या गेल्या होत्या. मात्र, ४० आमदारांवरून आम्ही आज ६० आमदार निवडून आणून दाखवले आहेत. आज सर्वत्र पक्षाचे नगरसेवक, सभापती असून सगळीकडे शिवसेनेचे वादळ फडकत आहे.' असेही सांगितले

ते ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांचा



पाय नेहमी ब्रेकवर असायचा. आम्ही आता महायुतीम्हणून महाराष्ट्राचा विकास वेगाने करत आहोत.

आमचा पाय ॲस्किलेटरवर राहणार आहे. राज्याचा विकास वेगाने पुढे जात राहिल. त्यांनी लावलेल्या अनेक कामांचा ब्रेक आम्ही काढला असेही त्यांनी सांगितले.

पुढे त्यांनी म्हटले की माझ्या आयुष्यात डोंगरा एवढी दुःख होऊन गेली, मी डगमगलो नाही राज्यातील तमाम जनता हेच माझे कुटुंब आहे, माझ्यामागे कुणी गॉड फादर नव्हता पण माझ्या शिवसैनिकांच्या पाठबळावर येथपर्यंत पोहचलो आहे. कार्यकर्त्याला एवढ्या मोठ्या पदापर्यंत नेण्याची ताकद फक्त शिवसेनेनत आहे असेही त्यांनी ठामपणे सांगितले. ही शिवसेना आहे शिवसैनिक हाच खरा आमच्या पाठीचा कणा आहे. बाळासाहेब म्हणायचे शिवसैनिक हे मोठे पद आहे, पक्ष म्हणजे शिवसैनिक आहे आणि त्यांच्या जीवावर आपण मोठे होतो. माझ्यासारखा शाखाप्रमुख महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होऊ शकतो हीच शिवसैनिकांची ताकद आहे असे उदाहरण त्यांनी आपल्या भाषणातून दिले.

# युद्धखोर इस्त्रायलची शांतता कराराला दुसऱ्याच दिवशी केराची टोपली; लेबनॉनमधील हल्ल्यात १८ मृत्यूमुखी

लेबनॉन दि.१९ (वृत्तसंस्था)- इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करारावर स्वाक्षरी झाली. दुसऱ्याच दिवशी इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ला केला, ज्यात किमान १८ जण ठार झाले. शांतता कराराच्या अटींनुसार, इस्त्रायलला लेबनॉनवरील हल्ले थांबवणे आवश्यक होते, परंतु पंतप्रधान नेतान्याहू यांनी नकार दिला. इस्त्रायली सैन्याने (आयडीएफ) गुरुवारी रात्रीपासून दक्षिण आणि पूर्व लेबनॉनमधील ८० हून अधिक लक्ष्यांवर हवाई हल्ले केल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल ्लाहच्या हल्ल्यांमध्ये चार इस्त्रायली सैनिक ठार झाले. यामुळे संतप्त झालेल्या इस्त्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन ग्विर यांनी एक तीव्र विधान जारी करून म्हटले आहे की, संपूर्ण लेबनॉन जळून खाक झाले पाहिजे.

अमेरिका आणि इराण यांच्यात आज स्वित्झर्लंडमध्ये होणारी चर्चा रद्द करण्यात आली आहे. अमेरिकन वृत्तसंस्था ॲक्सिओसच्या मते, इस्त्रायलकडून लेबनॉनवर सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे हे घडले असावे. सीएनएनने एका राजनैतिक अधिकाऱ्याच्या हवाल्याने असेही म्हटले आहे की, इराणने म्हटले आहे की, जर अमेरिकेने लेबनॉनवरील हल्ले थांबवण्याची हमी दिली तरच पुढील चर्चा होईल.

मनीकंट्रोल या आर्थिक आणि व्यावसायिक वृत्त पोर्टलनुसार, जर इराणवरील निर्बंध शिथिल केले गेले आणि त्याने पूर्ण क्षमतेने तेल निर्यात पुन्हा सुरू केली, तर तो वार्षिक १०५ अब्ज डॉलर्स (अंदाजे ९.९ लाख कोटी रुपये) पर्यंत कमाई करू शकतो. सध्याच्या तेलाच्या किमतीनुसार, दररोज ३.५ दशलक्ष बॅरल उत्पादनातून दररोज अंदाजे २८९ दशलक्ष डॉलर्स किंवा वार्षिक १०५.४ अब्ज डॉलर्स उत्पन्न मिळू शकते. भविष्यात, जर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर शुल्क आकारले गेले, तर इराण तेल, वायू आणि इतर मालवाहू जहाजांमधून वार्षिक अतिरिक्त २.५ अब्ज डॉलर्स देखील कमावू शकतो.

# आत्महत्या केलेल्या नीट विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्या

## सीजेपीचे अभिजित दीपकेंचे पीएम मोदींना पत्र

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी पंतप्रधान मोदींकडे आत्महत्या केलेल्या नीट विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात दीपके यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे. त्यांनी लिहिले आहे की, देशातील वातावरण तरुण पिढीच्या जीवनावर आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. त्यांनी इशारा दिला आहे की, कोणतीही कारवाई न केल्यास विद्यार्थी आणि पाल कांमधील निराशा आणखी वाढू शकते. ा शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपी उद्या, २० जून रोजी दिल्लीतील जंतर मंतर येथे पुन्हा आंदोलन करणार आहे. या महिन्यात जंतर मंतर येथील सीजेपीचे हे दुसरे मोठे आंदोलन असेल. यापूर्वी, ६ जून रोजी सीजेपीने केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्ल ीत आंदोलन केले होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात आंदोल नांची लाट कायम आहे. या संदर्भात, 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) या सोशल मीडिया संघटनेने अलीकडेच देशभरातील विविध राज्यांमध्ये धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

# मी कधीही भीक मागणार नाही; डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जॉर्जियो मेलोनी संतापल्या

वॉशिंग्टन दि.१९ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि तिचे पारंपरिक मित्रराष्ट्र यांच्यातील तणाव वाढत आहेत. त्यातच इटलीच्या पंतप्रधान जॉर्जियो मेलोनी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्यांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ट्रम्प यांची विधाने पूर्णपणे बनावट असल्याचे सांगत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आपल्याच मित्रराष्ट्रांशी अशा प्रकारे वागत असल्याचे पाहून धक्का बसला आणि दुःख झाले असं मेलोनी यांनी म्हटलं आहे.

मेलोनी यांनी स्पष्टपणे सांगितले की, ट्रम्प यांची विधाने तथ्यहिन आहेत. असं पहिल्यांदाच घडलेले नाही, पण हे अत्यंत लाजिरवाणे आहे. ट्रम्प आपल्या मित्र राष्ट्रांप्रती जी कणखरता दाखवतात, तीच कणखरता ते पाश्चात्य विरोधक आणि अमेरिकेच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध का दाखवत नाहीत असा परखड प्रश्न इटलीच्या पंतप्रधानांनी केला आहे.

मेलोनी यांनी एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यात त्या म्हणाल्या की, काही गोष्टींना तात्काळ उत्तर देण्याची गरज आहे. डोनाल्ड ट्रम्प यांची वक्तव्ये पूर्णपणे बनावट आणि खोटी आहेत. खरे सांगायचे तर, मला अत्यंत धक्का बसला आहे आणि मी हैराण झाले आहे. ज्यांची धोरणे पाश्चिमात्य हितांच्या विरोधात असल्याचे मानले जाते, अशा अनेक जागतिक नेत्यांबद्दल ट्रम्प यांनी तुलनेने सौम्य भूमिका घेतली आहे. मित्र राष्ट्रांवर दबाव आणणे सोपे आहे, परंतु विरोधकांना ताकद दाखवण्यातच खरे नेतृत्व दिसून येते असा संताप मेलोनी यांनी व्यक्त केला. परंतु या व्हिडिओच्या शेवटी मेलोनी यांनी कठोर संदेश दिला आहे. ''एक गोष्ट लक्षात ठेवा, मी आणि इटली कधीही भीक मागत नाही..'' असं त्यांनी ठणकावले.

दरम्यान, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मेलोनी यांच्याबद्दल केलेले विधान अत्यंत गंभीर आणि अपमानाजनक आहे. हा केवळ मेलोनी यांचाच नाही तर संपूर्ण इटलीचा अपमान आहे. याच कारणामुळे मी २१ आणि २२ जून रोजीचा माझा नियोजित अमेरिका दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे असं इटलीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री अँटोनियो तायानी यांनी स्पष्ट केले.

# येत्या २४ ते २५ जूनपासून राज्यात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता, हवामान खात्याचा नवा अंदाज

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- यंदा केरळमध्ये उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने ६ जून रोजी तळकोकणात प्रवेश केला. त्यानंतर ८ जून रोजी रत्नागिरीतील हर्णे, सातारा आणि सोलापूर परिसरापर्यंत मान्सूनची मजल पोहोचली. त्यामुळे राज्यभरात लवकरच मान्सून सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, त्यानंतर मान्सूनची प्रगती जवळपास ठप्प झाली असून, महाराष्ट्रातील अनेक भाग अद्याप जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. हवामान तज्ज्ञांच्या मते, प्रशांत महासागरातील एल निनोला पोषक ठरणारी परिस्थिती आणि पश्चिमी जेट स्ट्रीम नेहमीपेक्षा अधिक दक्षिणेकडे सरकल्याने मान्सूनला गती देणाऱ्या वाऱ्यांवर परिणाम झाला. त्यामुळे मान्सूनचा वेग मंदावला आणि त्याची प्रगती थांबली.

८ जून रोजी दक्षिण कोकण आणि लगतच्या दक्षिण मध्य महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १० ते १५ जूनदरम्यान राज्याच्या बहुतांश (पान ४ वर)

# मंत्री गिरीश महाजन यांची तरुणीसोबतची आक्षेपार्ह छायाचित्रे समाज माध्यमावर व्हायरल, जळगाव सायबर पोलिसांत गुन्हा दाखल

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी)- भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांची एका तरुणीसोबतची काही आक्षेपार्ह छायाचित्रे शुक्रवारी समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. दरम्यान, सदरची छायाचित्रे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आल्यानंतर या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. संबंधित छायाचित्रे बनावट तसेच बदनामीच्या उद्देशाने प्रसारित केल्याप्रकरणी जळगाव येथे सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, मंत्री महाजन यांनी स्वतः आपण याचा लवकरच सविस्तर खुलासा करणार असल्याचे म्हटले आहे.

प्राथमिक तपासात एका फेसबुक खात्याद्वारे मंत्री गिरीश महाजन यांचे एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार केलेले अथवा मॉर्फ केलेले छायाचित्र वापरून आक्षेपार्ह आणि बदनामीकारक पोस्ट प्रसारित करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आधारे सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३५६, ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६ (सी) आणि ६७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित सोशल मीडिया खात्याचा तसेच पोस्ट प्रसारित करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. याशिवाय, सायबर पोलिसांकडून डिजिटल पुरावे संकलित करण्यात येत असून, पोस्टचा मूळ स्त्रोत तसेच ती तयार करणारी व्यक्ती आणि प्रसाराचे जाळे यांचा तपास केला जात आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सतीश गोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दरम्यान, या वादग्रस्त छायाचित्रावरून राज्यातील राजकीय वातावरणही तापले आहे. (पान ४ वर)

# भावनिक दृष्ट्या निर्णय चुकीचा मात्र, राजकीयदृष्ट्या विचार केला तर बरोबर-ओमराजे निंबाळकर

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- राज्याच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना ठाकरे गटाला लागल ेली मोठी गळती आता उघड झाली आहे. ठाकरे गटाचे ६ खासदार पक्षाचा व्हीप धुडकावून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करणार हे जवळपास निश्चित झाले आहे. या बंडखोर खासदारांच्या यादीत धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. पक्ष सोडण्याच्या या मोठ्या निर्णयावर एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ओमराजे निंबाळकर यांनी आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली असून ठाकरे गटाच्या नेतृत्वावर, विशेषतः आदित्य ठाकरे यांच्यावर थेट निशाणा साधला आहे.

मुलाखतीदरम्यान ओमराजे निंबाळकर यांनी महायुती सरकारच्या नेतृत्वाचे कौतुक करताना ठाकरे गटाच्या कार्यपद्धतीवर अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली. ओमराजे म्हणाले, 'मुख्यमंत्री (पान ४ वर)

# मुख्यमंत्री विजय यांना सुप्रीम कोर्टाचा दिलासा; विश्वासदर्शक ठरावावेळी 'घोडेबाजार' झाल्याचा आरोप करणारी याचिका फेटाळली

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत आपला करीश्मा दाखवणारे नेते जोसेफ विजय यांनी १० मे रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी जोसेफ विजय यांना विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. राज्यपालांच्या आदेशानुसार, मुख्यमंत्री विजय यांनी १३ मे रोजी विधानसभेत विश्वासदर्शक ठराव बहुमताने जिंकला होता.

विश्वासदर्शक ठरावाच्या कामकाजादरम्यान काँग्रेस, सीपीआय(एम), व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) यांनी विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिला. दरम्यान, तमिळनाडू विधानसभेत १३ मे रोजी झालेल्या विश्वासदर्शक ठरावावेळी कथित अनियमितता आणि 'घोडेबाजार' झाल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच विश्वासदर्शक ठरावावेळी झालेल्या कथित अनियमिततेची चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

या याचिकेवर आता सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असून तमिळनाडू विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावेळी 'घोडेबाजार' झाल्याचा आरोप करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावली आहे. या आरोपांना पुष्टी देणारा कोणताही पुरावा नसल्याने त्याबाबत विचार करता येणार नाही, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. त्यामुळे मुख्यमंत्री विजय यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली आहे. यावेळी निरीक्षण नोंदवलं न्यायालयाने म्हटलं की, ''हे आरोप अस्पष्ट, निराधार आणि वरकरणी केलेले दिसत आहेत. त्या दाव्यांना पुष्टी देण्यासाठी रेकॉर्डवर कोणतीही विश्वसनीय सामग्री उपलब्ध असल्याचं दिसत नाही. त्यामुळे चौकशीचे आदेश देण्यासारखा कोणताही विश्वसनीय पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यात आलेला नाही.''

# हॉटेल्स, रेस्टॉरंट्समध्ये फक्त फूड-ग्रेड व गंजरोधक उपकरणे वापरणे बंधनकारक, अन्यथा होणार कारवाई

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर व प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. हॉटेल्स, रेस्टॉरंट्ससह अन्न प्रक्रिया उद्योगात अन्न हाताळणी, प्रक्रिया आणि पॅकिंग करताना केवळ फूड-ग्रेड, विषमुक्त आणि गंजरोधक सुरी, ब्लेड; तसेच इतर कापण्याची उपकरणे वापरणे बंधनकारक असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

एफएसएसएआयने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, काही अन्न व्यवसायांमध्ये गंजलेल्या, तडे गेलेल्या, खराब झालेल्या अथवा रंग लावलेल्या सुरी व कापण्याच्या साधनांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा उपकरणांमुळे अन्नामध्ये भौतिक, रासायनिक आणि सूक्ष्मजीवजन्य दूषितीकरण होण्याची शक्यता असून त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे प्राधिकरणाने म्हटले आहे.

अन्न तयार करणे, प्रक्रिया करणे, पॅकिंग करणे आणि साठवणूक करण्यासाठी वापरल्या (पान ४ वर)

# रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन अखेर स्थगित

## गिरीश महाजनांची मध्यस्थी, सरकारला दिला ४ दिवसांचा अल्टीमेटम

बुलढाणा दि.१९ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी पुकारलेले बेमुदत अन्नत्याग आंदोलन आज पाचव्या दिवशी स्थगित करण्यात आले आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारच्या वतीने मध्यस्थी करत आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी महाजन यांनी येत्या चार-पाच दिवसांत मुख्यमंत्र्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर, तुपकर यांनी आपल्या आईच्या आणि मंत्री महाजन यांच्या हस्ते ज्युस पिऊन अन्नत्याग आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, ''चार दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा रस्त्यावर उतरू,'' असा खणखणीत इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे.

मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अत्यंत संवेदनशील आहे. पावसाळी अधिवेशन सुरू असले तरी, येत्या चार ते पाच दिवसांत मुंबईत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कर्जमाफीच्या अटी ठरवणाऱ्या प्रवीण परदेशी समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत रविकांत तुपकर आणि त्यांच्या शिष्टमंडळाची स्वतंत्र बैठक आयोजित केली जाईल.

तुपकर यांच्या अन्नत्यागामुळे त्यांची किडनी आणि साखरेची पातळी खालावल्याचा वैद्यकीय अहवाल आल्याने, महाजन यांनी त्यांना प्रकृतीची काळजी घेण्याची विनंती केली आणि चळवळीतील नेत्याचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले.

रविकांत तुपकर यांनी स्पष्ट केले की, ''सरकारच्या विनंतीला आणि शब्दाला मान देऊन आम्ही केवळ अन्नत्याग थांबवत आहोत, पण आमचा लढा थांबलेला नाही. सरकारला आम्ही चार ते पाच दिवसांचा वेळ देत आहोत.'' जर मुंबईतील बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक आणि ठोस निर्णय झाला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रभर अत्यंत आक्रमकपणे आणि लोकशाही मार्गाने रस्त्यावरची आंदोलने पुन्हा सुरू केली जातील, असा इशारा त्यांनी दिला.

# कशासाठी व्यायाम ?

जसजसं वय वाढत जातं, तशतशा शारीरिक शक्ती क्षीण होऊ लागतात. त्याचं दृश्य परिणाम हरघडीला जाणवत राहतात. म्हणजे असं की सुईत सहजपणं दोरा ओवणं जमत नाही, लांबवरुन येणारी व्यक्ती ओळखीची वाटते; पण ती नेमकी कोण हे सांगता येत नाही; गॅसवर पाणी तापत ठेवलं, तर ते उचलून न्हाणीघरात घेऊन जाता येईल ना, अशी शंका वाटू लागते. दोन जिने चढायचे म्हटलं, तरी नको वाटू लागतं. कांद्याची गरमागरम भाजी खातानाही ही पोटाला त्रास तर देणार नाहीत ना, अशी भीती मनाच्या एका कोपऱ्यात दाटून येते आणि अगदी समोरुन सुटणाऱ्या बेतात असणारी गाडी पळत जाऊन पकडणं जिवावर येऊ लागतं. थोडक्यात काय, तर आता तारुण्य ओसरत चाललं आहे, आणि आता आपला म्हातारपणाकडं प्रवास सुरु झाला आहे, याची अत्यंत दु:खद जाणीव होऊ लागते.

पण काही जणांना यापलीकडंही काही त्रास होऊ लागतात. त्यांची विचारशक्ती कमी होते. स्मृती दगा देऊ लागते आणि कोणत्याही गोष्टीचा कार्यकारणभाव लावणं जमेनासं होतं. या साऱ्या लक्षणसूहाला 'डिमेन्शिया' असं म्हणतात. त्याला पारिभाषिक शब्द आहे, मेंदूची अवमनस्कता. थोडक्यात, मेंदूच्या शक्तींचा ऱ्हास होणं किंवा त्या क्षीण होणं. म्हणजेच डिमेन्शिया हे रोगाचं नाव नसून लक्षणसमूहाचं नाव आहे. या लक्षणांमध्ये व्यक्तिमत्त्वातच बदल घडणं, मूड पालटणं, वर्तनात फरक पडणं यांचाही समावेश होतो. एखाद्या आजारामुळं किंवा व्याधीमुळं किंवा अपघातात जखमी होऊन मेंदूलाच मार लागल्यानं डिमेन्शिया झाला, तर तो बरा करता येत नाही. मात्र अतिरिक्त मद्यपान, काही औषधं किंवा जीवनसत्वांतील समतोल ढळणं यामुळं डिमेन्शिया झाला, तर तो बरा करता येतो. मात्र डिमेन्शियाला लांब ठेवायचं असेल, तर वय वर्ष ४० ते ५५ या वयोगटातल्यांनी आठवड्यांतून किमान दोन ते पाचवेळा तरी शारीरिक व्यायाम करणं आवश्यक आहे, असं आता तज्ज्ञाचं म्हणणं आहे. असा व्यायाम केला, तर डिमेन्शिया होण्याची संभाव्यता ५० टक्क्यांनी कमी होते; तर ज्यांना आनुवंशिकतेनं अल्झायमर्स होण्याचा धोका असतो, अशांबाबतही डिमेन्शिया होण्याची संभाव्यता जवळपास ६० टक्क्यांनी कमी होते, असं स्वीडनमधील संशोधकांचं म्हणणं आहे. ते म्हणतात, ऐन तारुण्यात आणि मध्यमवयातही ज्यांची जीवनशैली चांगली असते, (म्हणजेच पायी फिरणं, नियमीतपणे व्यायाम करणं, योग्य आहार घेणं, व्यसनांना दूर ठेवणं) त्यांना म्हातारपणही सुखाचं होऊ शकण्याची संभाव्यता अधिक असते. जे वीस वर्षांहून अधिक काळ नियमीतपणं व्यायाम करतात, त्यांना डिमेन्शिया होण्याची संभाव्यता अधिकच कमी होते; कारण यापूर्वीच्या अभ्यासातून दीर्घकाळ केला जाणारा नियमीत व्यायाम डिमेन्शियाला दूर ठेवतो, हे सिद्ध झालं आहे. इथं एक लक्षात घ्यायला हवं की डिमेन्शिया विकसीत होण्यास बराच काळ लागतो आणि त्याचं निदान होतं तेव्हा गोष्टी खूपच पुढं गेलेल्या असतात.

डिमेन्शियाच्या संदर्भात आता नव्यानं केलेल्या अभ्यास पाहणीत १५०० स्त्री-पुरुषांचा समावेश होता. ते सर्व ६५ ते ७९ या वयोगटातले होते. त्यातील २०० जणांना डिमेन्शिया किंवा अल्झायमर्सनं पछाडलेलं होतं. या सर्वांची वय ४०ते ५५ होती, तेव्हा त्यांची जीवनशैली कशी होती, याचा शोध या संशोधकांनी केला. ज्यांना अल्झायमर्स किंवा जीवनशैली या वयात (४० ते ५५) सुस्तपणाची होती, असं या पाहणीतून निष्पन्न झालं.

आता साहजिकच प्रश्न पडतो की या व्यापापासून स्वत:ला दूर ठेवायचं, तर किती व्यायाम करायला हवा? तर आठवड्यातून किमान तीनदा ते पाचदा तरी २० ते ३० मिनीटं घाम गळेपर्यंत आणि श्वासोच्छवास जलद होईपर्यंत तो करायला हवा, असं या संशोधकांचं सांगणं आहे. मध्यमवयीनांसाठी इतका व्यायाम पुरेसा असतो; मात्र त्यात नियमीतपणा असणं अत्यावश्यक असतं, असं स्पष्ट करायला हे संशोधक विसरत नाहीत. हा व्यायाम एकंदर शरीर आणि मेंदू तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतो. नियमीत व्यायामामुळं मेंदूतील लहान रक्तवाहिन्या 'निरोगी' राहण्यास मदत होतेच; शिवाय रक्तदाब आटोक्यात राहतो आणि मधुमेहही दूर राहण्यास मदत होते. अल्झायमर्समध्ये मेंदूत होणाऱ्या एमिलॉईड या प्रथिनाचं प्रमाणही व्यायामामुळं कमी होण्याची संभाव्यता असते. तसंच जनुकांवरही व्यायामाचा सुपरिणाम होतो. मेंदू तल्लख राहण्यास आणि स्मृती शाबूत राहण्यासही व्यायाम उपकारक ठरतो. दुसरं असं की नियमीत व्यायाम करणारी व्यक्ती आरोग्यपूर्ण जीवनशैली नकळतपणं अंगिकारते. अनारोग्यकारक गोर्ष्टींपासून ती दूर राहते किंवा त्या विशिष्ट मर्यादेत राहतील, असा कटाक्ष ठेवतो. थोडक्यात, नियमीत व्यायाम, आरोग्यदायी असा समतोल आहार डिमेन्शियाला दूर ठेवतो. संशोधकांनी अभ्यास पाहणीतून सांगितलेला हा मंत्र प्रत्यक्ष आचरणात आणून आपलं म्हातारपण सुखाचं करायचं की नाही, हे मात्र ज्यानंत्यांनच ठरवायचं आहे. त्यासाठी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणं (किती आणि कोणत्या प्रकारचा व्यायाम करावयाचा याबाबत) केव्हाही उत्तम !

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण

**मतदार** याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस शनिवार दि.२० जून पासुन सुरुवात होणार आहे. गणना अर्जाची छपाई व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आटोपल्यावर येत्या ३० जून पासून मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पुर्वीच्या नोंदीशी जुळवणी केली जाईल. प्रारुप मतदार याद्या दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक निर्दोष करण्यासाठी राबविली जात आहे. लोकशाही बळकट करणाऱ्या निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी व मतदारांच्या मताच्या हक्काचे संरक्षण होण्यासाठी पुनरिक्षण आवश्यक आहे. जाणून घेऊ या पुनरिक्षण प्रक्रियेविषयी-




**विशेष सखोल पुनरिक्षणाचा इतिहास** – भारत निवडणूक आयोगामार्फत संपूर्ण देशात मतदार याद्यांचे सखोल पुनरिक्षण करण्यात येत आहे.याबाबत दि.२४ जून २०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यापूर्वी देशात सन १९५२-५६, १९५७, १९६१, १९६५-१९६६, १९८३-८४, १९८७-८८, १९९२, १९९५, २००२-२००४ या वर्षी विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आले आहे.

**१६ राज्यांत मोहीम**

या मोहिमेचा तिसरा टप्पा १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशात राबविण्यात येत आहे. संविधानाच्या कलम ३२६ प्रमाणे मतदार यादीत मतदाराचे नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती ही भारताचा नागरिक असणे आणि वयाची १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे.

**पुनरिक्षण मोहिमेचे वेळापत्रक**

दि.२० ये २९ जून दरम्यान गणना अर्जाची छपाई व बीएलओ यांचे प्रशिक्षण, दि.३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करुन ते भरुन अर्ज परत घेतील. दि.५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी, दि.५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदविणे, ३ ऑक्टोंबर पर्यंत दावे व हरकती निकाली काढणे, दि.७ ऑक्टोंबर रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी.

**काय होणार पुनरिक्षण प्रक्रियेत?**

दि.३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी हे मतदारांच्या घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करतील. त्यात मतदारांची मतदार यादीतील सध्याची माहिती आधीच भरलेली असेल. तसेच सन २००२-२००४ मध्ये झालेल्या सखोल पुनरिक्षणातील माहिती (आई वडील/आजी आजोबा यांची) भरलेली असेल किंवा मतदार स्वतः ही भरु शकेल. तसेच मतदारांना आपले नवीन छायाचित्रही उपलब्ध करुन देता येईल. सद्यस्थितीत या जुन्या नोंदीची जुळवणी सद्याच्या मतदारांशी केली जाईल. ही कारवाई मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. घरोघरी गेल्यावर गणना प्रपत्रात जुनी माहिती भरणे सहज शक्य व्हावे म्हणून ही पुर्वतयार करण्यात आली आहे. आता पर्यंत ७६.६० टक्के ही प्रक्रिया (मॅपिंग) पूर्ण झाली आहे.

**ऑनलाईन पर्यायही उपलब्ध**

आपल्या आई-वडील/ आजी आजोबा यांच्या सन २००२-०४ या कालावधीतील नोंदीची माहिती भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर सहज उपलब्ध होईल. त्यासाठी केवळ मतदाराने आपले राज्य, जिल्हा, विधानसभा मतदार संघ व संपुर्ण नाव इतकी प्राथमिक माहिती भरली तरी जुन्या नोंदी सहज उपलब्ध होतील. ही मतदाराने आपल्याकडे जतन करुन ठेवावी व आपल्या घरी आलेल्या गणना कर्मचाऱ्याला उपलब्ध करुन द्यावी. घरोघरी भेटी दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या घरी किमान ३ वेळा येईल व भेट दिल्याची नोंद ठेवेल.पुन्हा गणना पत्र गोळा करण्यासाठी हे अधिकारी भेट देतील. याशिवाय मतदार हे गणना पत्र ऑनलाईनही भरु शकतील.

**प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी**

प्रारुप मतदार यादी दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होईल. ज्या मतदारांची नावे पुर्वीच्या यादीशी जुळवणी झाले नसतील वा त्यात काही त्रुटी असतील अशा व्यक्तिंना नोटीस पाठवून कळिवले जाईल. तसेच या याद्या नावे समाविष्ट न झाल्याच्या कारणासह संबंधित मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, तहसिल कार्यालय, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर इ. ठिकाणी प्रसिद्ध करणात येतील. त्यावर हरकतीही नागरिकांना घेता येतील अशी तरतूद आहे.

**राजकीय पक्षांचाही सहभाग**

या प्रक्रियेत राजकीय पक्षांनाही सहभागी केले जाणार असून त्यांनीही आपले मतदान केंद्र प्रतिनिधी नेमावे , जेणे करुन ही प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक होण्यास मदत होईल.

**जिल्ह्याची सद्यस्थिती**

जिल्ह्यात एकूण मतदार ३२ लाख १७ हजार २३६ इतके असून आतापर्यंत २४ लाख ६४ हजार ५३१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. या गणनेसाठी ३२६४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी ३२७ सुपरवायझर नेमण्यात आले आहेत. याशिवाय ९ ईआरओ, ३३ एईआरओ नियुक्त करण्यात आले आहे.

**मतदारांसाठी माहितीची उपलब्धता** – प्रत्येक सहायक निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या शिवाय १९५० या हेल्पलाईन क्रमांकावरही नागरिकांना माहिती उपलब्ध होईल. या शिवाय 'बुक अ कॉल', ही सुविधाही एउखछएढ या मोबाईल ॲपवर उपलब्ध असेल.

**-माहिती संकलनः जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

# जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

**वडिलांचा** मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल. मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळया नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते. आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते. त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली.



आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल. पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व ॲटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी-आजोबा, काका-काकु, मामा-मामी, आत्या-मामा, ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-ॲन्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते. आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे. यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे. त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी. यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# पूर्णा यार्ड येथे रेल्वे अपघात बचाव व पुनर्स्थापना कार्यासाठी मॉक ड्रिल

नांदेड, दि. १९ (प्रतिनिधी) – रेल्वे आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांमधील समन्वय व सज्जतेची चाचणी घेण्यासाठी पूर्णा रेल्वे स्थानक यार्ड येथे वरिष्ठ रेल्वे अधिकारी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), राज्य शासन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणावर रेल्वे अपघाताचे अनुकरण करणारी सर्वसमावेशक मॉक ड्रिल यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.

या मॉक ड्रिलमध्ये उन्हाळी विशेष एक्स्प्रेस गाडी क्रमांक ०००0१ ला अपघात झाल्याची परिस्थिती निर्माण करण्यात आली. त्यामध्ये एक सामान्य द्वितीय श्रेणी डबा (GS क्रमांक ०३७४३५) वेगळा झाल्याचे आणि दुसरा डबा गार्ड-कम-लगेज व्हॅन (SC HmH 011037 GSLR) वर चढल्याचे दर्शविण्यात आले. ही घटना पूर्णा स्थानक यार्डमध्ये मास्ट क्रमांक ३१९/१२५२-१२५६ जवळ सकाळी ०९:०५ वाजता घडल्याचे गृहीत धरण्यात आले. आपत्कालीन कार्यवाहीसाठी शेजारील रेल्वे मार्ग मोकळा ठेवण्यात आला. अनुकरणात्मक आपत्कालीन परिस्थितीनुसार अपघात निवारण रेल्वेगाडी (ART), स्वयंचलित वैद्यकीय मदत वाहन (SPMRV), अग्निशमन दल, NDRF, सिव्हिल डिफेन्स, रेल्वे वैद्यकीय पथके आणि रेल्वे सुरक्षा बल (RPF) यांना तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले.

मुख्यालयातून श्री मुरली कृष्णा, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी तथा प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता, श्री धर्मेंद्र कुमार, मुख्य यांत्रिक अभियंता (नियोजन), श्री मुथुस्वामी, उपमुख्य यांत्रिक अभियंता/डिझेल, श्री किशोर, उपमुख्य सुरक्षा अधिकारी/यांत्रिक तसेच वरिष्ठ विभागीय वैद्यकीय अधिकारी/चीफ लगद/सिकंदराबाद यांनी या सरावात सहभाग घेतला. नांदेड विभागाकडून विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री प्रदीप कामले, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री कल्याण राजू तसेच सुरक्षा, अभियांत्रिकी, संरक्षा, वैद्यकीय, विद्युत, ट्रॅक्शन, सिग्नल, परिचालन, यांत्रिक, वाणिज्य आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या मॉक ड्रिलदरम्यान १४ स्काऊट अँड गाईड स्वयंसेवक आणि १५ रेल्वे कर्मचाऱ्यांनी जखमी प्रवाशांची भूमिका साकारली. सूचना मिळाल्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. NDRF, ART आणि बचाव पथकांनी तात्काळ डब्यांच्या खिडक्या व छताचे भाग कापून अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्याचे कार्य सुरू केले. छऊठऋ, सिव्हिल डिफफेन्स, वैद्यकीय पथक, ठझऋ कर्मचारी आणि स्काऊट अँड गाईड स्वयंसेवक यांच्या संयुक्त प्रयत्नांतून सर्व २९ अनुकरणात्मक जखमी प्रवाशांची यशस्वी सुटका करण्यात आली.

सुटका करण्यात आलेल्या प्रवाशांवर रेल्वे व राज्य शासनाच्या वैद्यकीय पथकांनी प्रथमोपचार केले आणि सरावाचा भाग म्हणून त्यांना राज्य शासनाच्या रुग्णालयांमध्ये हलविण्यात आले. आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेत आणखी सुधारणा करण्यासाठी सर्व सहभागी संस्थांनी संयुक्त निरीक्षणे नोंदविली.

याचवेळी अपघात निवारण रेल्वेगाडीच्या कर्मचाऱ्यांनी १४० टन क्षमतेच्या क्रेन आणि विशेष अठढ उपकरणांच्या सहाय्याने पुनर्स्थापना कार्य केले. त्यामुळे रेल्वे पथकांची कमीत कमी वेळेत रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्याची क्षमता प्रभावीपणे प्रदर्शित झाली.

NDRF अधिकाऱ्यांनी, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी तसेच प्रधान मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांनी सरावापूर्वी आणि सरावानंतर सविस्तर मार्गदर्शन व आढावा बैठक घेतली. संपूर्ण मॉक ड्रिलवर वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी यांनी बारकाईने लक्ष ठेवून सर्व उपक्रमांचे समन्वयन केले तसेच सहभागी पथकांच्या कामगिरीचा आढावा घेतला.

या मॉक ड्रिलमध्ये विविध विभागांतील सुमारे १६० रेल्वे कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या सरावाद्वारे रेल्वे प्रशासन व संबंधित यंत्रणांची रेल्वे अपघात व्यवस्थापन, बचाव कार्य, वैद्यकीय स्थलांतरण आणि आपत्कालीन परिस्थितीत रेल्वे वाहतूक पुनर्स्थापना याबाबतची सज्जता, समन्वय आणि त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता यशस्वीपणे प्रदर्शित झाली.

# मासे विक्रीच्या वादातून तरुणाच्या खूनप्रकरणी तिघांना अटक; शरणापूर फाट्यावरून पोलिसांची कारवाई

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – मासे विक्रीचे दुकान लावण्याच्या कारणावरून झालेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शाहरूख शकील खान (३०, रा. बायजीपुरा) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याप्रकरणी जिन्सी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. शरणापूर फाटा परिसरातून शहर व ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने १८ जून रोजी ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये समीर शरिफ शहा (१९), माजिद शफी खान (२७, दोघे रा. रहीमनगर) आणि मोहंमद अक्रम अब्दुल रहेमान (२७, रा. चिश्तिया कॉलनी) यांचा समावेश आहे. यापैकी समीर शहा याला न्यायालयाने २१ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक गणेश ताठे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ जून रोजी मासे विक्रीच्या दुकानावरून झालेल्या वादातून शाहरूख खान याच्यावर हॉकिस्टिकने हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर उपचार सुरू असताना १५ जून रोजी त्याचा मृत्यू झाला. सुरुवातीला या प्रकरणात प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, मृत्यूनंतर गुन्ह्यात खुनाचे कलम वाढविण्यात आले.

खुनाचे कलम वाढविल्यानंतर संतप्त नातेवाईकांनी जिन्सी पोलीस ठाण्यात जाऊन तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाची गती वाढवत आरोपींचा शोध सुरू केला.

दरम्यान, या गुन्ह्यातील दोन आरोपी यापूर्वीच एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यातील एका अन्य गुन्ह्यात अटकेत असल्याची माहिती समोर आली आहे. तर तीन आरोपी फरार होते. ते शरणापूर फाटा परिसरात असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर उपायुक्त रत्नाकर नवले व पोलीस निरीक्षक गणेश ताठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गौतम वावळे यांच्या पथकाने सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुणा घुले करीत आहेत.

# श्री.धनंजय औंढेकर महावितरणच्या संचालक (संचालन) पदी रूजू

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून श्री.धनंजय औंढेकर यांनी गुरुवारी (१८ जून) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. श्री.औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.



नवनियुक्त संचालक (संचालन) श्री.धनंजय औंढेकर हे मूळचे औंढा नागनाथचे (जि. हिंगोली) रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून ॲडव्हान्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. संचालक श्री.औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि.बीड) येथे रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली. या विविध पदांवर श्री.औंढेकर यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण, मुंबई मुख्यालयात काम केले आहे.

संचालक (संचालन) श्री.औंढेकर हे २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवले. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा जागतिक विक्रम केल्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जाहीर केले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावरील सौर प्रकल्पांमध्ये देशात द्वितीय स्थान पटकावले. या योजनेसाठी महावितरणने देशात सर्वप्रथम फेसलेस–पेपरलेस ही ऑनलाइन सुविधा सुरू केली. नवीन वीजजोडणी, ग्राहक नावात बदल आणि वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रक्रिया सुरू केली. यामध्ये संचालक श्री.औंढेकर यांचे मोठे योगदान आहे.

'अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात सांघिक कामगिरीतून कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही व हरित ऊर्जेकडे नेण्यास आणखी प्राधान्य देण्यात येईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया फेसलेस–पेपरलेस म्हणजे पूर्णतः ऑनलाईन करण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवा, वीज हानीमध्ये घट आणि महसूलवाढ हे मुख्य ध्येय आहे', असे महावितरणचे नवनियुक्त संचालक (संचालन) श्री.धनंजय औंढेकर यांनी सांगितले.

# जायन्ट्स ग्रुपतर्फे मनपा शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार; 'सेल्फ-स्टडी' करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक



छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – खासगी शिकवणीचा (ट्युशन) कोणताही आधार न घेता, केवळ स्व–अभ्यासाच्या (सेल्फ–स्टडी) जोरावर १० वी मध्ये ८५% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या महानगरपालिका शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा 'जायन्ट्स ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर'तर्फे नुकताच भव्य सत्कार करण्यात आला. हॉटेल रेड वेलव्हेट येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.

या प्रेरणादायी सोहळ्याला मनपाचे शिक्षण उपायुक्त श्री. पांढरे सर, ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी रईसा बेगम खान मॅडम यांची उपस्थिती होती. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी ग्रुपचे सन्माननीय सदस्य व मुख्य प्रायोजक श्री. केशवभाई पटेल यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारी उच्च दर्जाची पाठ्यपुस्तके आणि वह्यांचे वाटप करण्यात आले. विशेष बाब म्हणजे, अंधत्वावर मात करत ८०.६०% मिळवणाऱ्या सिडको एन–७ मनपा शाळेतील कु. तनुजा रगडे या दृष्टीहीन विद्यार्थिनीचा विशेष रोख पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

या संपूर्ण प्रकल्पाचे अत्यंत उत्कृष्ट नियोजन आणि सूत्रसंचालन माजी अध्यक्षा व प्रकल्प प्रमुख सौ. पूजा विठोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जायन्ट्स ग्रुपचे अध्यक्ष श्री. देवेंद्र शेठ, प्रशासन संचालक (ऊजअ) श्री. विष्णू राऊत आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली.

# सिडको महिला मोर्चाच्या वतीने कार्यशाळा उत्साहात संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – रोजी सिडको महिला मोर्चाच्या वतीने कार्यशाळा व संवाद चे आयोजन केले होते.देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांना पंतप्रधान म्हणून १२ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल यांच्या नेतृत्वात भारत देशामध्ये ओके कुकिंग विदाऊट ऑइल आणि गॅस हे अभियान चालू आहे त्या अनुषंगाने सिडको एन–६, मथुरानगर येथे कार्यशाळा घेण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मंत्री मा.ना. श्री. अतुलजी सावे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार व *प्रदेशाध्यक्षा आ.चित्राताई वाघ यांच्या सूचनेनुसार, मराठवाड्याच्या संयोजिका सौ.प्रणिताताई चिखलीकर व महिला मोर्चा अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर डॉ. उज्वला दहिफळे यांच्या सहकार्याने भाजपा सिडको महिला मोर्चा मंडळाच्या वतीने Cooking Without Oil And Gas" या विषयावर महिलांची कार्यशाळा व संवाद साधण्यात आला.

याप्रसंगी डॉ.उज्वला दहिफळे मॅडम महिलांना पौस्टिक आहाराविषयी मार्गदर्शन व आरोग्यविषयक सल्ला दिला. यावेळी नगरसेविका सौ.मीनाताई खरात, महिला मोर्चा शहर सरचिटणीस सौ.कविताताई देशमुख, सौ.संगीताताई जयस्वाल, सौ.प्रतिभा लिपणे, यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी श्रीमती नंदाताई पांडे, सौ. शुभांगीताई दाभाडे, सौ.अनुपमाताई भोंडवे, सौ. सुनिताताई गिरी, सौ. रंजनाताई सामग यांनी परिश्रम घेतले व या उपक्रमातून तेल व गॅसचा वापर न करता पौष्टिक आणि आरोग्यदायी आहार कसा तयार करता येतो, यावेळी ड्रायफ्रुट लाडू, जवसाचे लाडू, मटकी मिसळ यांसारखे पौष्टिक पदार्थ तयार करून उपस्थितांना याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच ऊर्जा बचत, इंधन संवर्धन आणि निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी सौ.अनिता कसारे, सौ.महानंदा गायकवाड, श्रीमती लक्ष्मी यादव, सौ.अनिता टेकाळे, सौ.लता गायकवाड, सौ. पौर्णिमा टोम्पे सौ. सुरेखा दहिवाळ, सौ.आशा वानखेडे, सौ.राणी खरात, सौ. कोमल खरात इत्यादी कार्यक्रमाला हजर होते.

या कार्यक्रमाचे आयोजन व प्रस्ताविक सिडको मंडळाच्या अध्यक्षा सौ.लक्ष्मी रामदास गायकवाड यांनी केले. कार्यशाळा व संवाद मेळाव्याला भाजपा पदाधिकारी व परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सैनिकी मुला-मुलींचे वसतीगृह, विश्रामगृह येथे कंत्राटी पदभरती

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाअंतर्गत सैनिकी मुला मुलींचे वसतीगृह, सैनिकी विश्रामगृह, कारगिल स्मृतीवन येथे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीन पदभरती राबविण्यात येणार आहे. या पदांसाठी माजी सैनिक, विधवांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

पदांची माहिती याप्रमाणे–

**१.सैनिकी मुला–मुलींचे वसतीगृह–** सहाय्यक वसतीगृह अधीक्षक–१, सहाय्यक वसतीगृह अधीक्षिका– १, चौकीदार (पुरुष–१, महिला–१) –२, सफाई कामगार (पुरुष–१, महिला–१)–२,स्वयंपाकी(महिला)–५, माळी कामगार (पुरुष–१, महिला–१)–२,

**२.सैनिकी विश्रामगृह–** चौकीदार(पुरुष)–१, सफाई कामगार(महिला)–१.

३. कारगिल स्मृतीवन– माळी कामगार(पुरुष)–२

वरील सर्व पदांसाठी किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांनी अर्ज करावा. उमेदवार शारिरीक दृष्ट्या सक्षम असावा. उमेदवारांना वैयक्तिक अर्ज, आधार कार्ड, रहिवाशी दाखला, पी.पी.ओ. बँक पासबुक, डिस्चार्ज बुक इ. कागदपत्रांसह आपला अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नंदनवन कॉलनी, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे दि.२९ जून पर्यंत जमा करावे. वरील पदांसाठी माजी सैनिकांमधून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अन्य नागरिक उमेदवारांमधून पदे भरण्यात येतील, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळिवले आहे.

# सातव्या आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी देवीदास फुलारी; मॉरिशसमध्ये २५ जून रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा ज्येष्ठ कवा सातव्या आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी देवीदास भाऊराव फुलारी यांची निवड करण्यात आली आहे.



येत्या २५ जून रोजी मॉरिशस या ब्देशात हे संमेलन होणार आहे. महात्मा गांधी इन्स्टिट्यूट मॉरिशस आणि स्नेहल आर्ट्स अँड एज्युकेशन सोसायटी डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सातव्या आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी येथील साहित्यिक देवीदास फुलारी यांची निवड झाल्याचे संमेलन आयोजक प्रा. कल्पना गवरे यांनी कळवले आहे. मॉरिशस येथील महात्मा गांधी इन्स्टिट्यूटच्या सभागृहात हे संमेलन गुरुवार दि. २५ जून २०२६ रोजी आयोजित केले आहे.

ग्रंथदिंडी, उद्घाटन सोहळा, परिसंवाद, चर्चासत्र, गझल मुशायरा, कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन इत्यादी भरगच्च कार्यक्रम या संमेलनात पार पडणार आहेत. मॉरिशस येथील मराठी भाषिक विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक आणि रसिकांची लक्षणीय उपस्थिती या संमेलनात राहणार असल्याचे नियोजन समितीचे अध्यक्ष रवींद्र सोनवणे यांनी कळवले आहे.

# ५० वर्षीय इसम बेपत्ता; माहिती कळवण्याचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – येथील रामा चौक पदमपुरा भागातील रहिवासी रामा सोनाजी बोकन (वय ५० वर्षे) हा इसम दि.९ जून पासून घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेला आहे. याबाबत त्यांची पत्नी अनिता हिने वेदांत नगर पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. बेपत्ता इसमाचे वर्णन– उंची ५ फुट ५ इंच, रंग–गोरा, नाक– सरळ मोठे, डोळे–काळे,केस–काळे–पांढरे, मिशी–बारीक, अंगात पांढऱ्या रंगाचा चट्टूया पट्टूयाचा शर्ट, काळ्या रंगाची पॅण्ट, पायात काळ्या रंगाचा बुट, मराठी हिंदी भाषा बोलता येते.

वरील वर्णनाच्या इसमाबद्दल कोणास माहिती मिळाल्यास वेदांत नगर पोलीस स्टेशनचे हवलदार व्ही.के. चव्हाण यांना ९७६७१७०११० या क्रमांकावर माहिती द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्मार्ट मीटर सक्तीला विरोध; वाढीव वीज बिलांची चौकशी करून जुने मीटरच सुरू ठेवावेत

## – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – राज्यात सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देऊन वाढीव वीज बिलांची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच सर्वसामान्य ग्राहकांना जुने (पारंपरिक) मीटर वापरण्याचे स्वातंत्र्य द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वाजेद असलम यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री तसेच महावितरणचे मुख्य अभियंता यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक भागांमध्ये वीज बिलात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे सामान्य व गरीब कुटुंबांवर आर्थिक ताण वाढत असून नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवेदनात ग्राहक संरक्षण कायदा २०१९ चा उल्लेख करत ग्राहकांना त्यांच्या पसंतीनुसार वीज मीटर निवडण्याचा अधिकार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्राहकांची संमती न घेता स्मार्ट मीटरची सक्ती करणे हे अन्यायकारक असून अशा प्रकारे नागरिकांच्या निवडीच्या अधिकारावर गदा येत असल्याचेही म्हटले आहे.

तसेच स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ज्या ग्राहकांचे वीज बिल नियंत्रित होते, त्यांचे बिल आता अनेक पटींनी वाढल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्मार्ट मीटर नको असलेल्या ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच जुने मीटर पुन्हा बसवून देण्यात यावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सरकारने या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनावर प्रदेश सरचिटणीस वाजेद असलम यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष शेख शफीक,जिल्हाध्यक्ष अब्दुल रज्जाक पठाण,जिल्हा कार्याध्यक्ष सय्यद लायकोद्दीन,जिल्हा कोषाध्यक्ष शेख सलीम,जिल्हा संघटक जावेद मदार, शहर उपाध्यक्ष अश्फाक जमील खान, जिल्हा सरचिटणीस शेख मुश्ताक आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अन्न सुरक्षेबाबत एफएसएसएआयचे राज्यांना कडक निर्देश

नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था)– भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. अन्न हाताळणी, प्रक्रिया आणि पॅकिंग करताना केवळ 'फूड–ग्रेड' (अन्न–दर्जा), विषमुक्त आणि गंजरोधक सुऱ्या, ब्लेड तसेच इतर कापण्याची उपकरणे वापरणे बंधनकारक असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

'एफएसएसएआय'ने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, काही अन्न व्यवसायांमध्ये गंजलेल्या, तडे गेलेल्या, खराब झालेल्या अथवा रंग लावलेल्या सुऱ्या व कापण्याच्या साधनांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा उपकरणांमुळे अन्नामध्ये भौतिक, रासायनिक आणि सूक्ष्मजीवजन्य दूषितीकरण होण्याची शक्यता असून, त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे प्राधिकरणाने म्हटले आहे.

अन्न तयार करणे, प्रक्रिया करणे, पॅकिंग करणे आणि साठवणूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व उपकरणांचा तसेच अन्नाच्या संपर्कात येणाऱ्या पृष्ठभागांचा दर्जा 'फूड–ग्रेड' व गंजरोधक असणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, अशा उपकरणांची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि योग्य देखभाल करण्यावर भर देण्यात आला आहे. गंज, तडे, रंग निघणे किंवा इतर दोष असलेली उपकरणे तात्काळ बदलण्याच्या सूचनांसह अन्न व्यवसायांनी स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या सर्व मानकांचे काटेकोर पालन करावे, असेही 'एफएसएसएआय'ने स्पष्ट केले आहे.

या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास 'अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६' तसेच संबंधित नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्राधिकरणाने दिला आहे. राज्य अन्न सुरक्षा आयुक्त, परवाना प्राधिकरणे आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणीदरम्यान विशेष दक्षता बाळगण्याचे तसेच नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या मूर्तीला हानी पोहोचल्यास मंदिरे समिती व पुरातत्त्व विभागावर फौजदारी खटला दाखल करू !

## मंदिर महासंघ व वारकरी संघटना यांचा इशारा !

पंढरपूर, दि. १८ (प्रतिनिधी) – पंढरपूर येथील कोट्यवधी हिंदूंचे आराध्यदैवत असलेल्या 'स्वयंभू' श्री विठ्ठल–रुक्मिणी मूर्तीवर पुरातत्त्व विभागाद्वारे २३–२४ जून रोजी नियोजित असलेल्या रासायनिक वज्रलेपन प्रक्रियेला (Epoxy/Silicon) वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने कडाडून विरोध केला आहे. कोरोना काळात केलेले लेपन पुढील १० वर्षे टिकेल असा दावा प्रशासनाने केला होता; मात्र अवघ्या ४–५ वर्षांतच मूर्तीला पुन्हा लेपनाची आवश्यकता भासणे हे या रासायनिक प्रक्रियेचे अपयश सिद्ध करते. तब्बल २८ युगे विटेवर सुखरूप उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या मूर्तीच्या पायाला कोरोना टाळेबंदीच्या काळात खड्डा कसा पडला आणि श्री रुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले, याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिर समिती किंवा पुरातत्त्व विभागाला देता आलेले नाही. कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून ठिसूळ होण्याचा गंभीर धोका असल्याने, वारकरी संत–महंत आणि मूर्तीशास्त्रज्ञांना विश्वासात न घेता प्रशासनाने एकतर्फी पाऊल उचलल्यास संपूर्ण महाराष्ट्रात जनक्षोभ निर्माण होईल. इतके झाल्यावरही रासायनिक लेपन प्रक्रिया लादण्याचा प्रयत्न झाल्यास आम्ही श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समिती आणि पुरातत्व विभाग यांच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशारा महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिला पत्रकार परिषदेत दिला आहे. या संदर्भातील निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व मंदिरे समिती यांना सादर करण्यात आले आहे.

या प्रसंगी वारकरी पाईक संघाचे ह.भ.प. रामकृष्ण हनुमंत महाराज वीर, प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पीठासीन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे जिल्हा संयोजक श्री. चंद्रकांत रमणशेट्टी, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे उपस्थित होते. १० वर्षांपूर्वी कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मीदेवीच्या मूर्तीला सेंद्रीय लेपन प्रक्रिया वापरून वज्रलेप, तर पंढरपूर येथील मूर्तीला रासायनिक लेपनाचा अट्टाहास का? १० वर्षांपूर्वी जेव्हा कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मीदेवीच्या मूर्तीला केंद्रीय पुरातत्व विभागाचे अधिकारी एमब.र्आ. सिंह यांनी २२ जुलै ते ६ ऑगस्ट २०१५ या कालावधीत वज्रलेप केला होता. त्या वेळी श्री महालक्ष्मीदेवीची मूर्ती ज्या पाषाणात घडवली होती त्या पाषाणाची भुकटी यांचे विशिष्ट प्रमाणातील मिश्रण मूर्तीमध्ये सोडण्यात आले होते. या प्रक्रियेत मूर्तीवर बेहडा, दुर्वा यांचा अर्क आणि बिब्ब्याचे तेल वापरून सेंद्रीय मिश्रणाचा वापर करण्यात आला होता. त्या काळी जर श्री महालक्ष्मीदेवीच्या मूर्तीला सेंद्रीय लेपन प्रक्रिया वापरून वज्रलेप करण्यात आला होता, तर आता पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या मूर्तीला रासायनिक लेपनाचा अट्टाहास का ? त्या वेळी करण्यात आलेली कृती जर योग्य असेल, तर आताची कृती अयोग्य आहे, असेच म्हणावे लागेल. अत्यल्प निधीमध्ये होणाऱ्या सेंद्रीय लेपनाऐवजी खर्चित रासायनिक आणि अशास्त्रीय लेपनाचा आग्रह धरून पुरातत्व विभागाचे अधिकारी विलास वहाणे यांना काय साध्य करायचे आहे ? यातून खर्च पडणारा अधिक निधी यांसाठीच तर हे षडयंच रचले जात नाही ना ? अशी शंका घेण्यास निश्चित इथे वाव आहे !

**मूर्तीला रासायनिक लेपन करणे चुकीचे ! – श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर**

या संदर्भात करवीर पीठाचे श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य यांचे मत विचारले असता त्यांनी, ''यथा देहे तथा देवे' या उक्तीनुसार रासायनिक वज्रलेप केल्यास या पद्धतीने कोणतेही रसायन आपल्या शरीराचा दाह करते, तसेच त्या मूर्तीचा दाह होता. त्यामुळे 'रासायनिक वज्रलेप करू नये', असे आमचे स्पष्ट मत आहे.'' असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. त्यामुळे शंकराचार्य यांच्यासारख्या आध्यात्मिक अधिकारी व्यक्तीपेक्षा पुरातत्व विभागाच्या अधिकार्यांना अधिक कळते का ? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

वारकरी पाईक संघाचे ह.भ.प. रामकृष्ण हनुमंत महाराज वीर म्हणाले, ''गेल्या काही वर्षांत मूर्तीवर ४ ते ५ वेळा रासायनिक प्रयोग करण्यात आले आहेत, ज्याचा परिणाम म्हणून मूर्तीची हानी होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मी देवीच्या मूर्तीवर झालेल्या रासायनिक प्रक्रियेमुळे मूर्तीचे अतोनात नुकसान झाले होते, हा इतिहास डोळ्यांसमोर असताना पंढरपुरात पुन्हा तीच चूक केली जात आहे. कोणत्याही शास्त्रीय प्रक्रियेपूर्वी याचे दिवाणी व फौजदारी उत्तरदायित्व (Legal Liability) निश्चित होणे आवश्यक आहे; त्यामुळे या प्रक्रियेत विठ्ठल किंवा रुक्मिणीमातेच्या मूर्तीला कोणतीही हानी पोहोचल्यास संबंधित अधिकारी आणि मंदिर समितीवर धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी आणि राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केल्याप्रकरणी थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी वारकरी व हिंदु संघटना न्यायालयात धाव घेतील.''

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मनपा मिटमिटा शाळेत आयुक्त अमोल येडगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला

## जुलै महिन्यात नवीन इमारतीत स्थलांतर



छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजी नगर- महानगरपालिका अंतर्गत मनपा माध्यमिक विद्यालय मिटमिटा येथे आज सकाळी मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी अचानक भेट दिली. व दहावीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी त्यांना नवीन शाळेत स्थलांतर कधी होणार असे विचारले असता लवकरच नवीन शाळेमध्ये मनपा मीटमिटा विद्यालय स्थलांतर होईल असे आयुक्तांनी सांगितले.

मनपाची माध्यमिक विद्यालय मीटमिटा ही शाळा रस्ता रुंदीकरणांमध्ये जाणार असल्यामुळे शहरातील उद्योजक जुगल किशोर तापडिया यांनी मनपा परिसरामध्ये त्यांच्या मालकीच्या असलेल्या तीन एकर जमिनीवर सुसज्ज इमारत बांधून दिली आहे.

किरकोळ कामे बाकी असल्यामुळे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात स्थलांतर होईल असे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत ननावरे यांनी सांगितले.

या नवीन इमारतीच्या बांधकाम झाल्यामुळे शाळेमध्ये परिसरातील पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश घेतला आहे. मागील शैक्षणिक वर्षात ५०० विद्यार्थी या शाळेत प्रवेशित होते.

नवीन इमारत व शाळेमध्ये असलेल्या सर्व सुविधा बघून परिसरातील पालकांनी या शाळेमध्ये प्रवेश घेतला आहे आज पर्यंत साडेसहाशे विद्यार्थी प्रवेशित झालेले आहे. व दररोज प्रवेशासाठी पालकांची गर्दी होत आहे. याप्रसंगी आयुक्तांनी परिसरातील पालकांशी संवाद साधून शाळेच्या गुणवत्तेबद्दल आढावा घेतला व समाधान व्यक्त केले.

# सेवानिवृत्ती लाभांच्या प्रस्तावासाठी पन्नास हजारांच्या लाचेची मागणी

## कन्नडमधील मुख्याध्यापिका, वरिष्ठ लिपिक एसीबीच्या जाळ्यात

कन्नड दि.१९ (प्रतिनिधी)- शहरातील संजय गांधी उर्दू हायस्कूलमधील सेवानिवृत्त लिपिकाचे 'जीपीएफ' आणि रजेचे शिल्लक राहिलेले अंदाजे ११ लाख रुपयांचे देयक मंजूर करून मिळवून देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मुख्याध्यापिका आणि लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

मुख्याध्यापिका शेख नाजिया इस्माईल (५७) आणि लिपिक शेख जावेद मसोऊदिन (५५) अशी लाचखोर आरोपींची नावे आहेत. याबाबत मिळालेली माहिती अशी की, तक्रारदार हे याच शाळेतून लिपिक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे भविष्य निर्वाह निधी आणि रजेचे शिल्लक राहिलेले अंदाजे ११ लाख रुपयांचे देयक मिळवून देण्याच्या मोबदल्यात मुख्याध्यापिका शेख नाजिया इस्माईल आणि लिपिक शेख जावेद मसोऊदिन यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. सेवानिवृत्त लिपिकाला ही लाच देणे योग्य वाटत नसल्याने त्यांनी या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) रीतसर तक्रार नोंदवली.

प्राप्त तक्रारीची शहानिशा केल्यानंतर 'एसीबी'च्या पथकाने गुरुवारी (दि.१८) दुपारी १ वाजता संजय गांधी उर्दू हायस्कूलच्या परिसरात सापळा रचला. तक्रारदाराकडून ५० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना दोन्ही आरोपींना पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या या धडक कारवाईनंतर, दोन्ही आरोपींविरुद्ध कन्नड शहर पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी करत आहेत.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'शब्दयात्रा, कविता आणि बरेच काही...' २८ जून रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील साहित्य आणि कलाप्रेमींसाठी या महिन्यातला शेवटचा रविवार (२८ जून) एक अनोखी मैफल घेऊन येत आहे. 'सुजनरंगोत्सव' अंतर्गत 'शब्दयात्रा, कविता आणि बरेच काही...' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे सायंकाळी साडेपाच वाजता आयोजन करण्यात आले आहे. न्यायमूर्ती कै. धनंजय गोविंद देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे.

महोत्सवाचे प्रथम वर्ष आहे. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पुण्याच्या प्रसिद्ध नृत्यांगना जयश्री म्हरोळकर आणि त्यांचा समूह सादर करत असलेला नेत्रदीपक 'कथ्थक नृत्यविष्कार'. यासोबतच एक कविसंमेलनही पार पडणार आहे, अशी माहिती कवयित्री मृणाल देशपांडे यांनी दिली.

कविसंमेलनात राज्यातील नामवंत कवी आणि कवयित्री आपल्या कविता सादर करतील. त्यात प्रफुल्ल कुलकर्णी (पुणे), अमिता पेठे पैठणकर (पुणे), गिरीश जोशी, प्रिया धारूरकर, सुनील उबाळे, माधुरी चौधरी, सचिन वालतुरे, अंजली दीक्षित, अजय त्रिभुवन, संध्या फुलपगार, मृणाल देशपांडे यांचा समावेश आहे.

रविवारी सायंकाळी ५:३० ते ७:३० च्या दरम्यान औरंगपुऱ्यातील कै. गोविंदभाई श्रॉफ सभागृहात होणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी संपूर्णपणे विनामूल्य आणि खुला आहे. आयोजकांच्या वतीने सर्व रसिक प्रेक्षकांना या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

# पाच वर्षांखालील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये-अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- दिनांक २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेच्या प्रभावी नियोजनासाठी आज सायंकाळी स्मार्ट सिटी कार्यालयात अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्या अध्यक्षतेखाली कमिशनर टास्क फोर्सची बैठक संपन्न झाली.

यावेळी जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. सय्यद मुजीब, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्ज्वला भांबरे, पल्स पोलिओ मोहिमेच्या नोडल अधिकारी डॉ. मेघा जोगदंड, सर्व आरोग्य अधिकारी, खाजगी रुग्णालयांतील डॉक्टर, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांनी २८ जून रोजी होणारी पल्स पोलिओ मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. शहरातील पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीपासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यंदाच्या मोहिमेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सुमारे १ लाख ९९ हजार ५६ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी ६९१ पोलिओ बूथ, ५९३ घरभेट पथके, १३५ ट्रान्झिट पथके, २२ मोबाईल पथके आणि ३ रात्रीची विशेष पथके कार्यरत राहणार असून एकूण २०५० मनुष्यबळ मोहिमेत सहभागी होणार आहे. मोहिमेचे नियंत्रण मनपा मुख्यालयातील नियंत्रण कक्षामार्फत करण्यात येणार आहे.



२८ जून रोजी बूथ डे पार पडल्यानंतर शहरी भागात पुढील पाच दिवस घरभेटींद्वारे लसीकरण केले जाणार आहे. बसस्थानक, रेल्वे स्थानक, विमानतळ, मॉल, धार्मिक स्थळे, बांधकामे, वीटभट्ट्या, स्थलांतरित वस्त्या व इतर उच्च जोखीम क्षेत्रांमध्ये विशेष ट्रान्झिट व मोबाईल पथकांद्वारे बालकांचा शोध घेऊन लसीकरण केले जाणार असून मोहिमेच्या व्यापक जनजागृतीसाठी शाळा रॅली, बॅनर, पोस्टर्स, सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, वृत्तपत्रे, एफएम रेडिओ, केबल नेटवर्क, माईकद्वारे प्रचार तसेच मशिदी, मंदिरे आणि इतर धार्मिक स्थळांमधून जनजागृती करण्यात येणार आहे. स्वयंसेवी संस्था, आयएमए, आयएपी, रोटरी, लायन्स क्लब, एनसीसी, एनएसएस, शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, परिवहन विभाग तसेच प्रसारमाध्यमांनी सक्रिय सहभाग नोंदवून मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन बैठकीत करण्यात आले.

यावेळी सर्व विभागप्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रात जनजागृती, बूथवरील स्वच्छता, मनुष्यबळ उपलब्धता, उच्च जोखीम भागांचे पर्यवेक्षण आणि सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला २८ जून रोजी जवळच्या पोलिओ बूथवर नेऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहनही अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांनी केले.

# जिल्हा बँक निवडणुकीत संजना जाधव, अब्दुल समीर यांचे अर्ज वैध

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रातील सर्वात बलाढ्य आणि प्रतिष्ठेची समजली जाणारी छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीने अत्यंत नाट्यमय आणि मोठे वळण घेतले आहे. गेल्या ९ जून रोजी झालेल्या छाननी आणि राजकीय आक्षेपांच्या सुनावणीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अत्यंत कडक पावले उचलत बाद ठरवलेले सत्ताधारी शिंदेसेनेचे उमेदवार आ. संजना जाधव आणि माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांचे सुपुत्र तथा सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर यांचे उमेदवारी अर्ज आज विभागीय सहनिबंधकांनी कायदेशीर सुनावणीनंतर पूर्णपणे वैध ठरवले आहेत. अपील दाखल केलेल्या ९ प्रमुख उमेदवारांपैकी ८ जणांचे अर्ज संबंधित मतदारसंघात पुन्हा समाविष्ट करण्याचे आदेश आज, शुक्रवारी (दि. १९) सहनिबंधकांनी दिल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील चुरस कमालीची वाढली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण २१ संचालक मंडळाच्या जागांसाठी जिल्ह्यातील सर्वपक्षीय मातब्बर नेत्यांसह तब्बल १५८ उमेदवारांनी विविध मतदार संघातून २१४ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, ९ जून रोजी झालेल्या छाननी प्रक्रियेत आणि विरोधकांनी घेतलेल्या तांत्रिक आक्षेपांनंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी तब्बल ४५ उमेदवारांचे अर्ज एका फटक्यात बाद ठरवले होते. यामध्ये कन्नडच्या आमदार संजना जाधव आणि सिल्लोडचे वजनदार नेते आ. अब्दुल सत्तार यांचे सुपुत्र अब्दुल समीर यांचेही अर्ज अवैध ठरल्याने शिंदेसेनेला निवडणुकीच्या सुरुवातीलाच मोठा धक्का बसला होता. 'अतिशय क्षुल्लक आणि राजकीय दबावापोटी हे अर्ज बाद करण्यात आले आहेत; हा अर्ज कोणी बाद केला की कोणाच्या सांगण्यावरून यंत्रणेने करायला लावला, हे आम्हाला तपासावे लागेल,' अशा कडक शब्दांत आ. सत्तार यांनी तेव्हा तीव्र संताप व्यक्त केला होता.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या बड्या नेत्यांचे अर्ज नेमके का बाद केले होते आणि सहनिबंधकांनी त्यावर कसा तोडगा काढला, याची तांत्रिक माहिती समोर आली आहे. अब्दुल समीर हे ज्या दोन खाजगी जिनिंग व प्रेसिंग संस्थांचे अधिकृत संचालक आहेत, त्या संस्था बँकेच्या थकबाकीदार असून त्यातील एका संस्थेचे नाव अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आले होते. तसेच सोयगाव येथील त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीत जिल्हा बँकेची अधिकृत शाखा भाड्याने सुरू असल्याने 'लाभाचे पद' या तांत्रिक संकल्पनेखाली त्यांचा अर्ज बाद झाला होता. मात्र, अपिलाच्या सुनावणीत कागदपत्रांची पडताळणी करून विभागीय सहनिबंधकांनी हा आक्षेप फेटाळत समीर सत्तार यांचा अर्ज पूर्णपणे वैध ठरवला. दुसरीकडे, आ. संजना जाधव यांनी ज्या भालगाव विविध कार्यकारी सोसायटीमधून अर्ज भरला होता, त्या संस्थेच्या त्या सलग दोन वर्षे कायदेशीर सभासद नसल्याचे कारण देत त्यांचा अर्ज नाकारण्यात आला होता; परंतु त्यांचेही सर्व पुरावे ग्राह्य धरून सहनिबंधकांनी त्यांचे अपील मंजूर करत अर्ज पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात कायम ठेवला आहे.

# विरोधी पक्षाच्या आमदार, खासदारांना निधी न देण्याची सरकारची कार्यपद्धती-आ.कैलास पाटील

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील सहा खासदार फुटणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. संजय जाधव, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर,भाऊसाहेब वाकचौरे आणि ओमराजे निंबाळकर यांचा समावेश आहे. धाराशिव-कळंबचे ठाकरेंच्या सेनेचे आमदार कैलास पाटील यांनी या सर्व घडामोडींवर भाष्य केलं आहे. कैलास पाटील यांनी मला जायचं असतं तर सूरतच्या बॉर्डरवरुन परत आलो नसतो असं म्हटलं आहे. ओमराजे निंबाळकर आणि माझी मैत्री आहे परंतु मैत्री वेगळी आणि आणि राजकारण वेगळं आहे, असं पाटील यांनी म्हटलं. कैलास पाटील म्हणाले की निधी मिळत नाही, काम करता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे, आपण बघतोय की, यापूर्वीही सरकारं होती, त्या काळातही विरोधी पक्ष होते. पण आताचं सरकारची कार्यपद्धती विरोधी पक्षाच्या आमदार, खासदार, नगरसेवक किंवा सरपंच असू द्या, त्याला निधी द्यायचा नाही, हे त्यांचे धोरण ठरलेले आहे. विरोधी पक्षातील आमदारही शेवटी लोकप्रतिनिधी आहेत. विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून आला तरी त्या भागातील एखाद्या मतदारसंघातील जनता काही एका पक्षाची नसते. सत्ताधारी पक्षालाही काही प्रमाणात मतदान झालेले असते. आपण मंत्रिपदाची शपथ घेतो तेव्हा, तेव्हा स्पेसिफिक शब्द वापरतो, ममत्वभाव न बाळगता... पण हा ममत्वभाव सर्वसामान्य जनतेच्या बाबतीत का? आमदार आणि खासदार दुसऱ्या पक्षाचा असेल तर त्यामध्ये तेथील जनतेची चूक काय? ही चुकीची पद्धत सत्ताधारी पक्षाने आणली आहे. हे लोकशाहीसाठी खूप घातक आहे, असे कैलास पाटील 'बीबीसी मराठी 'ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले.

# येत्या दोन वर्षांत पैठणचे संत ज्ञानेश्वर उद्यान होणार पर्यटनाचे जागतिक केंद्र; विकासकामांचा आमदार विलास भुमरे यांच्याकडून आढावा

पैठण दि.१९ (प्रतिनिधी)- ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या पैठण नगरीच्या वैभवात आता आणखी भर पडणार असून, येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचा जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून विकास केला जाणार आहे. दोन वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही आमदार विलास भुमरे यांनी दिली.

संत ज्ञानेश्वर उद्यानात आयोजित विकासकामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीनंतर आमदार भुमरे यांनी अधिकाऱ्यांसह संपूर्ण उद्यान परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून आगामी कामांचा वेध घेतला. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामार्फत जायकवाडी धरण व उद्यान परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर भव्य प्रकल्प राबविण्यात येत आहे. संत ज्ञानेश्वर उद्यान, ॲडव्हेंचर पार्क आणि धरणाच्या डाउनस्ट्रीम भागातील सुमारे २३२ हेक्टर क्षेत्रात हा प्रकल्प साकारणार आहे. यासाठी जागतिक दर्जाचे अनुभवी विकासक, नामांकित हॉटेल-रिसॉर्ट कंपन्या आणि गुंतवणूकदारांकडून 'एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट' मागविण्यात आले असून, या प्रक्रियेचा वेग वाढवण्याच्या सूचना आमदारांनी दिल्या. बैठकीला कार्यकारी अभियंता गणेश हुसे, दीपक डोंगरे, तुषार विसपुते, मंगेश



शेलार यांच्यासह उद्यान विकास समितीचे प्रा. संतोष गव्हाणे, पवन लोहिया, शेखर शिंदे, जालिंदर आडसुळ, सतिष अंधाळे, नामदेव खरात, अनिकेत धारकर आदी उपस्थित होते.

स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेला गती 'या भव्य प्रकल्पामुळे पैठणच्या धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यामुळे स्थानिक पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळून पैठणी उद्योग आणि हस्तकला व्यवसायाची भरभराट होईल,' असा विश्वास आमदार भुमरे यांनी व्यक्त केला. या प्रकल्पामध्ये स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

(पान १ वरुन)

## येत्या २४ ते २५ जूनपासून राज्यात..

भागात पावसाला सुरुवात होणे अपेक्षित होते. मात्र, १८ जूनपर्यंत मान्सून कोकण पट्ट्यातच रेंगाळल्याचे चित्र दिसून आले. आता भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २४ ते २५ जूनपासून महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण किनारपट्टी आणि मुंबईत पावसाचा जोर वाढण्याचे संकेत आहेत. याशिवाय २५ ते २८ जूनदरम्यान किनारपट्टी भागात अतिवृष्टीचे ढग सक्रिय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मान्सूनच्या प्रगतीबाबत प्रतिक्रिया देताना हवामान अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी सांगितले की, मान्सूनची रेषा रत्नागिरीच्या हर्णेपासून सातारा आणि सोलापूरमार्गे दक्षिण महाराष्ट्रापर्यंत पोहोचली होती. मात्र, त्यानंतर पुढील प्रगती होऊ शकली नाही. यामागील प्रमुख कारण म्हणजे अरबी समुद्रात मोसमी वाऱ्यांना अपेक्षित ताकद मिळाली नाही. तसेच बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले नाही. या दोन्ही घटकांचा मान्सूनच्या पुढील वाटचालीवर थेट परिणाम झाला. मात्र आता अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर या दोन्ही बाजूंनी परिस्थिती अनुकूल होत असल्याचे संकेत विविध हवामान मॉडेल्समधून मिळत आहेत, अशी माहिती त्यांनी दिलीय.

## मंत्री गिरीश महाजन यांची...

विरोधी पक्षातील काही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी संबंधित छायाचित्रे सोशल मीडियावर शेअर करत मंत्री महाजन यांच्यावर टीका केल्याचे दिसून आले. त्यामुळे या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटू लागले आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनीही या संदर्भात पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केल्याची माहिती दिली आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आपण केली असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारांशी संवाद साधताना महाजन म्हणाले की, चौकशीतून सत्य समोर येईल आणि या प्रकरणामागील सर्व बाबी उघड होतील. तपास पूर्ण झाल्यानंतर आपण याबाबत सविस्तर खुलासा सादर करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## भावनिक दृष्ट्या निर्णय चुकीचा मात्र,...

देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सतत कार्यकर्त्यांमध्ये फिरतात, मेहनत घेतात. तर उद्धव ठाकरे यांना आरोग्याच्या कारणांमुळे सातत्याने फिरणे शक्य नसले तरी आदित्य ठाकरे यांनी अधिक सक्रिय राहायला हवे होते, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

पक्षांतराच्या निर्णयावर बोलताना ओमराजे भावूक म्हणाले की, 'मी सध्या मोठ्या धर्मसंकटात आहे. भावनिक दृष्ट्या पक्ष सोडण्याचा विचार केला तर निर्णय चुकीचा वाटतो. मात्र, राजकीयदृष्ट्या विचार केला तर बरोबर आहे,' असे त्यांनी म्हटले आहे.

## हॉटेल्स, रेस्टॉरंट्समध्ये फक्त फूड-ग्रेड व...

जाणाऱ्या सर्व उपकरणांचा तसेच अन्नाच्या संपर्कात येणाऱ्या पृष्ठभागांचा दर्जा फूड-ग्रेड व गंजरोधक असणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशा उपकरणांची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि देखभाल करण्यावर भर देण्यात आला आहे.

गंज, तडे, रंग निघणे किंवा इतर दोष असलेली उपकरणे तात्काळ बदलण्याच्या सूचनांसह अन्न व्यवसायांनी स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या सर्व मानकांचे काटेकोर पालन करावे, असेही एफएसएसएआयने स्पष्ट केले आहे.

या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ तसेच संबंधित नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्राधिकरणाने दिला आहे. राज्य अन्न सुरक्षा आयुक्त, परवाना प्राधिकरणे आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणीदरम्यान विशेष दक्षता बाळगण्याचे तसेच नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME -** SHIRISH KUMAR BHARAT NAIK
**NEW NAME-** SHIRISHKUMAR BHARATRAO NAIK
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS -** PLOT NO 59, NYAYALEEN HSG SOC, N-8, CIDCO, AURANGABAD MH.
**Affidavit No.- 81AB 224140**

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME

WE PARENTS RAHUL RAMESH JAISWAL AND TRAPTI RAHUL JAISWAL CHANGING NAME OUR DAUGHTER'S NAME FROM
**OLD NAME -** SHAGUN JAISWAL
**NEW NAME-** SHAGUN RAHUL JAISWAL
AS PER HER DOCUMENTS
**ADDRESS -** PLOT NO 8, PITAMBAR SADAN, NEAR PAWAN GAS OFFICE, VIKAS NAGAR, NEW OSMANPURA, AURANGABAD MH. 431001
**Affidavit No.- 81AB 224139**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 3000069912 | Work of O&M of 220 kv Substation village Vikhran. | 19,502,799.00/- | 198,527.99/- |

**Tender Cost:** Rs. 1180.00
**Contact Person:** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185/2810485
For further details visit our Website: **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC, Ghatghar**